**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**माहिती व जनसंपर्क विभाग**

**प्रसिद्धीपत्रक**

- **मिरा भाईंदर महानगरपालिकेचा पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी पुढाकार**
- **शहरातील सर्व मूर्तीकारांसह बैठक संप्पन्न**

मिरा-भाईंदर, ७ मार्च २०२५: मिरा भाईंदर महानगरपालिकेने पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली असून, 'बाप्पा माझा शाडूचा' हे विशेष अभियान सुरू केले आहे. या अभियानाच्या माध्यमातून मातीच्या गणेशमूर्तींचा प्रसार वाढवण्यासाठी आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी जनतेला सहभागी करून घेण्यात येत आहे. यासाठीच मिरा भाईंदर शहरातील सर्व मूर्तीकारांसह ७ मार्च २०२५ रोजी नगरभवन येथे बैठक घेण्यात आली. यावेळी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यात येणाऱ्या अडचणींवरील उपाययोजनांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली.

बाप्पा माझा शाडूचा या अभियानाचा एक भाग म्हणून 'बाप्पा कट्टा' हा उपक्रम राबविण्यास २७ फेब्रुवारीपासून सुरुवात झाली आहे. यात पर्यावरण तज्ज्ञांमार्फत पर्यावरणपूरक गणेशोत्सव आणि जीवनशैली याबाबत जनजागृती करण्यात येते. याच अभियानाचा पुढचा टप्पा म्हणून मिरा भाईंदर शहरातील सर्व मूर्तीकार, मूर्तीकार संघटनांचे अध्यक्ष यांच्या गणेश मूर्ती बनविण्याबाबतच्या समस्या समजून घेण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या चर्चेदरम्यान पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करताना येणाऱ्या अडचणी, मूर्तीकारांना भेडसावणाऱ्या समस्या आणि त्यावरील उपाययोजना याबाबत विस्तृत चर्चा करण्यात आली. या चर्चेदरम्यान मांडलेल्या अडचणींची नोंद महापालिका प्रशासनाने घेतली असून, तज्ज्ञांच्या मदतीने त्यावर नियोजनपूर्ण उपाययोजनात्मक पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे.

महानगरपालिकेचा उद्देश शाश्वत विकासाला प्राधान्य देताना, पर्यावरणपूरक गणेशोत्सव अधिक प्रभावीपणे साजरा करणे हा असून, त्यासाठी मूर्तीकारांना आवश्यक तो पाठिंबा देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. यामध्ये जागरूकता मोहीम, पर्यावरणपूरक मूर्तींसाठी प्रोत्साहन योजना आणि गणेश मंडळांसाठी मार्गदर्शन यांचा समावेश असणार आहे, अशी माहिती उपायुक्त (मुख्यालय) कल्पिता पिंपळे यांनी दिली. तसेच, महापालिकेकडून पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी राबवण्यात येणाऱ्या उपाययोजनांविषयीही त्यांनी सविस्तर माहिती दिली.

या बैठकीस शहर अभियंता दिपक खांबित, सहाय्यक आयुक्त योगेश गुणीजन आणि इतर अधिकारी उपस्थित होते. महापालिकेच्या या उपक्रमांमुळे गणेशोत्सव अधिक शाश्वत आणि पर्यावरणपूरक स्वरूपात साजरा करण्यास हातभार लागेल, असे बैठकीस उपस्थित पर्यावरणप्रेमींनी म्हटले आहे.